# परीक्षा पद्धती - काही विचार

जयंत नारळीकर

गेल्या शतकात केंब्रिज विद्यापीठात गणिताची सर्वोच्च परीक्षा - ट्रायपॉस - ही अत्यंत प्रतिष्ठेची समजली जाई. त्या परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होणाऱ्यांना रँग्लर (म्हणजे त्या विषयावर वाद घालू शकणारे) म्हणत आणि त्यांपैकी सर्वोच्च मार्क मिळवणाऱ्याला सीनियर रँग्लर म्हणत. १८९९ मध्ये हा किताब मिळवणारे अप्पासाहेब परांजपे हे पहिले भारतीय सीनियर रँग्लर.

सीनियर रँग्लरला पुष्कळ मानसन्मान मिळत. विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात प्रथम त्यालाच पदवी मिळे. पुढेही कॉलेजची फेलोशिप त्याला बहाल केली जाई आणि विद्यापीठात व बाहेरच्या जगातदेखील त्याला प्रतिष्ठा मिळे.

म्हणून सीनियर रँग्लर बनण्यासाठी हुशार विद्यार्थ्यांत चढाओढ असे. कॉलेज लेक्चर्स खेरीज कोचिंग क्लासेसना आश्रय मिळे. अर्थात कधी कधी स्वतः वर चढता चढता दुसऱ्याला खाली ओढण्याचे प्रयत्नही होई असत. ही एक चिंतेची बाब होती. पण अधिक चिंतेची बाब - जिच्यावर विद्यापीठातल्या प्राध्यापक मंडळींनी पुष्कळ चर्चा केली - ती म्हणजे सीनियर रँग्लरपद हे खरोखर गणिती प्रतिभेचे लक्षण असू शकत नाही याची जाणीव.

कारण सीनियर रँग्लर पुढे गणिती म्हणून चमकले असे हमखास विधान करता येत नाही. उलट अशी बरीच उदाहरणे सापडतात जिथे प्रथम स्थान पटकावणारी व्यक्ती पुढे संशोधनक्षेत्रात काही ठसा उमटवू शकली नाहीत तर तिच्या पाठोपाठचे. . . दुसरे, तिसरे, चौथे रँग्लर हेच अधिक प्रतिभाशाली ठरले. सीनिअर रँग्लर साठी पुष्कळ कोचिंग करून परीक्षाक्षेत्रात उतरलेले विद्यार्थी परीक्षेपुरते चमकले. पण संशोधनक्षेत्रात लागणाऱ्या उपजत चौकसबुद्धीची कमतरता त्यांना पुढे जाणवायची. अखेर १९०९ साली सीनिअर रँग्लर आणि इतर रँग्लरांचे मानांकन बंद करण्यात आले.

आजही गणिताची ट्रायपॉस परीक्षा अवघड आणि प्रतिष्ठेची मानली जाते. पण रँग्लरांची यादी अकारविल्हे प्रसिद्ध होते. त्यांचे नंबर लावले जात नाहीत. जरी परीक्षकांना सर्वोच्च मार्क मिळवणाऱ्याचे नाव माहीत असते तरी ते, ते नाव कसोशीने गुप्त ठेवतात.

✧✧✧

केंब्रिजच्या उदाहरणातून आपल्याला बोध घेता येईल का? दहावी आणि बारावी ह्या विद्यार्थ्यांच्या जीवनातल्या महत्वाच्या परीक्षा. त्यांत पहिले क्रमांक मिळवणारे पुष्कळ अभिनंदन - बक्षीसे - प्रसिद्धी च्या माऱ्यात सापडतात. इथे फरक एकेका मार्कावरून होतो. पण त्यामुळे 'मेरीट लिस्ट'ला अवास्तव महत्व प्राप्त होते - जसे केंब्रिजच्या वरील उदाहरणातून दिसते.

आता मेरिट लिस्टमधले विद्यार्थी अग्रक्रमाने वैद्यकीय अथवा अभियांत्रिकी क्षेत्राकडे वळतात. त्या क्षेत्रात त्यांपैकी पुष्कळांना व्यावसायिक यश पुढे मिळतेही. पण त्या क्षेत्रात त्यांच्या 'मेरिट'ची चमक दिसल्याचे मात्र ऐकू येत नाही. वैद्यकीय क्षेत्रात झपाट्याने प्रगती होते. नव्या संशोधनांचा, नव्या उपकरणांचा, नव्या औषधांचा फायदा रोग्यांना अनुभवायला मिळतो. पण ह्या घडामोडीत आपल्या परीक्षेतील गुणवत्तेचे शिक्कामोर्तब झालेल्यांनी कितपत हातभार लावला आहे? मला तरी अशी उदाहरणे ठाऊक नाहीत.

अभियांत्रिकी क्षेत्रात हाच अनुभव दिसून येतो. तंत्रज्ञानातील संशोधनाला जगात पुष्कळ वाव आहे. जागतिक स्तरावर वेगवेगळी पेटंटस् घेतली जातात, राबवली जातात. पण आपल्याकडे व्यावसायिक यशाचे प्रतीक काय? तर आहे त्या क्षेत्रात जास्तीत जास्त धंदा करून जास्तीत जास्त सुबत्ता मिळवणे. मग तुम्ही पूल बांधा, जनरेटर - डायनॅमो उभारा किंवा वीस-तीस मजली इमारती.

याचा अर्थ असा की आपल्या परीक्षा ज्या तऱ्हेने घेतल्या जातात, त्यांत गुणवत्तेचे जे निकष लावले जातात त्यांतून पुढील आयुष्यात संशोधन क्षेत्रात ठसा उमटवेल असा प्रतिभावंत विद्यार्थी आपल्याला शोधून काढता येत नाही. अर्थात् असे प्रतिभावंत लाखातून पाचसहाच असतील. . . पण ते आपल्या मेरिट लिस्ट मध्ये सापडत नाहीत.

याचे एक कारण म्हणजे आपल्या परीक्षांमध्ये ठराविक प्रश्न विचारून त्यांची ठराविक उत्तरे मागितली जातात आणि ती कोण सर्वात उत्तम देईल त्याला मार्क जास्त. तेव्हा उत्तरे कशी द्यावीत म्हणजे मार्क जास्त मिळतील हे सांगणाऱ्या शिक्षणाला आपोआप महत्व मिळते. आज सगळीकडे पसरलेल्या 'क्लासेस'च्या लोकप्रियतेचे रहस्य हेच आहे. . . जे शंभर वर्षांपूर्वी केंब्रिज विद्यापीठातील कोचिंग क्लासेसना गवसले होते. केंब्रिजने परीक्षा पद्धती बदलली, सीनियर रँग्लरची प्रथा बंद केली आणि ते कोचिंग क्लासेस संपुष्टात आले.

मला वाटते, १० वी आणि १२ वी च्या परीक्षांबाबत पुनर्विचाराची पुष्कळ गरज आहे. मार्कामार्कासाठी चढाओढ, विद्यार्थ्यांना वाटणारे 'टेन्शन' आणि अपेक्षेनुसार यश लाभले नाही तर येणारी 'ग्लानी'. . . हे आपल्या परीक्षापद्धती सदोष असल्याचे सुचवीत नाहीत का?

यावर उपाय काय? १० वी - १२ वी च्या संदर्भात ह्या सूचना आहेत.

प्रथम, मला वाटते गुणवत्ता यादीच काढून टाकावी. अमेरिकेत SAT, GRE सदृश परीक्षांत अमुक मार्काखाली किती टक्के विद्यार्थी आहेत हे सांगितले जाते. तसे करून पहावे. म्हणजे मार्कांचे जे 'इन्फ्लेशन' (- याला मार्कस्फीती म्हणावे का?) चालू आहे त्याला आळा बसेल.

परीक्षेत विचारले जाणारे प्रश्न ठराविक साच्याचे नसावेत. निदान त्यांची उत्तरे अमुक तऱ्हेनेच लिहिली पाहिजेत अशी अपेक्षा नसावी. 'मल्टिपल चॉईस' तऱ्हेची उत्तरे असली तर चुकीच्या उत्तरांना ऋणात्मक मार्क दिले जावेत.

बोर्डातर्फे परीक्षा घेण्यामागे उद्देश असतो की समान निकष लावून

उत्तरांचे मूल्यमापन व्हावे. परंतु प्रत्यक्षात तसे होते का? अपेक्षेपेक्षा कमी मार्क मिळणे, मार्कांची अफरातफर होणे वगैरे प्रकार ऐकू येतात ते बोर्डांचा आकार बेसुमार वाढल्यामुळे तर नव्हे? अशा स्थितीत प्रत्येक जिल्ह्यात एका बोर्डाने परीक्षा घेतली तर? अमुक बोर्ड जास्त मार्क देतो असे आरोप वर प्रथम सुचवलेल्या उपायांने टाळता येतील.

✧ ✧ ✧

माझा आणखी एक आक्षेप NTS, STS परीक्षांवर आहे. ह्या परीक्षांचे उद्दिष्ट T ह्या अक्षरात आहे याचा आता पूर्ण विसर पडला आहे. नाहीतर Social Studies सारख्या विषयाला यात महत्वाचे स्थान का मिळाले? ज्या विषयांत मार्क मिळवायला घोकंपट्टी हाच एक राजमार्ग असतो असे

***आजच्या संगणकाच्या जमान्यात माहितीचा प्रचंड साठा संगणकात भरला जातो. ती संपूर्ण माहिती मानवाने डोक्यात ठेवावी अशी अपेक्षा करणे मूर्खपणाचे आहे. आणि जो विद्यार्थी अशी माहिती जास्तीत जास्त आपल्या डोक्यात साठवतो तो प्रतिभावंत असा ग्रह करून घेणे त्याहूनही मूर्खपणाचे आहे. पण माहिती कोणत्या प्रकारची असू शकते, तिचा उपयोग काय, ती कशी मिळवावी ह्याची शिकवण आज अधिक मोलाची आहे.***

विषय, असे प्रश्न घालून परीक्षकांना पाठांतराची प्रतिभा शोधायची आहे का?

वास्तविक अशा परीक्षांत विचार करायची - स्वतंत्र विचार करायची - प्रवृत्ती शोधायची असते. गणित, विज्ञानातील कोडी (- येथेही रटण्याजोगा तपशील टाळून) किंवा भाषेचा - मग ती इंग्रजी - हिंदी वा मातृभाषा असो - प्रभावीपणे वापर इत्यादीवर भर असावा.

आजच्या संगणकाच्या जमान्यात माहितीचा प्रचंड साठा संगणकात भरला जातो. ती संपूर्ण माहिती मानवाने डोक्यात ठेवावी अशी अपेक्षा करणे मूर्खपणाचे आहे. आणि जो विद्यार्थी अशी माहिती जास्तीत जास्त आपल्या डोक्यात साठवतो तो प्रतिभावंत असा ग्रह करून घेणे त्याहूनही मूर्खपणाचे आहे. पण माहिती कोणत्या प्रकारची असू शकते, तिचा उपयोग काय, ती कशी मिळवावी ह्याची शिकवण आज अधिक मोलाची आहे.

एक गोष्ट सांगून हा लेख आटोपता घेतो. एका राजाकडे तीन पंडीत होते. पहिला कुठलीही गोष्ट एकदा ऐकून स्मरणात ठेवून पुन्हा उद्धृत करू शके. दुसरा दोनदा ऐकून तर तिसरा तीनदा ऐकून तसेच करू शके. कुठलाही बाहेरचा कवी दरबारात येऊन स्वतः केलेली कविता म्हणून दाखवून पुरस्कार मागे तेव्हा राजा त्या तीन पंडितांना क्रमाने तीच कविता म्हणायला सांगे. त्यांनी ते काम केल्यावर तो त्या कवीला म्हणे, ''पहा तुझ्या कविता नव्या नाहीत. त्या आमच्या एक, दोन नव्हे तर तीन पंडितांना माहित आहेत. तेव्हा तुला नव्या निर्मितीबद्दल पुरस्कार कसा द्यायचा?'' तो सृजनशील कवी निराश होऊन जाई.

आजच्या परीक्षा अशा सृजनशील प्रतिभेला पुरस्कृत करीत नाहीत तर घोकंपट्टी - पंडितांना प्रोत्साहन देतात.

●●